नियमित दिवाणी दावा क्र.४३९/२०१६
नि.क्र.---/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.३

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे वकील श्री. यु. एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. बेवनाळ ते धनेगांव अंदाजे अंतर ४० ते ५० कि.मी. चे आहे. बेवनाळ शिवरात माझ्या नावे जमीन नाही. वादी बशीरला याला एक भाउ व दोन बहिणी आहेत. वादीच्या वडीलांना मी पाहिले नाही. सर्वे नंबर ६८ मधील जमीन वादातीत आहे. सदर सर्वे नंबर मध्ये एकूण किती जमीन आहे व त्यामध्ये किती जमीन आहे हे मला माहित नाही. सर्वे नंबर ६८ च्या चतुःसिमा मी सांगु शकत नाही. प्रतिवादी क्र. १ ला किती भाउ व किती बहिणी आहेत याबाबत मला माहिती नाही. वादीच्या वडीलांना किती भाउ व बहिणी आहेत याबाबत मला माहिती नाही. बेवनाळमध्ये वादीकडे ७ एकर जमीन आहे व प्रतिवादीकडे किती जमीन आहे हे मला माहिती नाही. मी लातूर येथील कोर्टामध्ये सन १९८० मध्ये प्रतिवादी विरुद्ध फौजदारी केस दाखल केली नव्हती. बेवनाळ येथे प्रतिवादीला शेत आहे किंवा नाही हे मला माहिती नाही, परंतु तेथे त्यांच्या वडीलांना शेत होते.

२. मी दावा मिळकतीमध्ये सन १९७६-७७ मध्ये रोजनदारींने वादींच्या वडीलांकडे काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सन १९७७ पासून सदर शेतामध्ये गेलो नाही. वादी व प्रतिवादीच्या वडीलांमध्ये कोण मोठे होते हे मला माहिती नाही. वादी आणि प्रतिवादीच्या वाद होता याबाबत मला माहिती होते. त्याच्यांमध्ये ३५ ते ४० एकर जमीनी बाबत वाद होता. सदर दोन भावांमधील वाद सन १९७६-७७ पुर्वीच मिटला आहे. त्या दोघांच्या दरम्यान माझ्या समक्ष तडजोडीच्या लेखी दस्त झालेला नव्हता. सन १९७६-७७ नंतर वादी व प्रतिवादींच्या वडीलांची माझी भेट झाली नव्हती. सन १९७६-७७ नंतर दावा मिळकतीची काय परिस्थिती आहे याबाबत मला माहिती नाही. वादी व प्रतिवादीमध्ये माझ्या समक्ष कोणताही वाद झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.09.26 16:36:52 +0530

दि.२५/०९/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.